सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८५ | मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या आरोग्यासाठी युवा सेनेतर्फे विशेष पूजा, महाआरती

## श्री मंगळग्रह देवांच्या चरणी लीन होऊन विविध पदाधिकाऱ्यांकडून विधीवत प्रार्थना



*अमळनेर : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निरोगी आरोग्यासाठी येथील युवा सेनतर्फे रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी येथील श्री मंगळग्रह मंदिरात विशेष पूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण पाटील, तालुकाप्रमुख राहुल कंजर, उपतालुकाप्रमुख राहुल पाटील, उपशहरप्रमुख सनी चव्हाण, शहर संघटक पंकज चौधरी, उपशहर संघटक यश साळुंखे तसेच तीर्थक्षेत्र शहरप्रमुख मनीष चौधरी, अमन खाटीक, सचिन पाटील, अजय पवार, प्रदीप देशमुख, कुणाल शिरसाट व शिवसेनेच्या धर्मवीर आध्यात्मिक सेना समन्वयक तथा श्री मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती ठीक नसल्याने ते सध्या ठाणे येथील रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यामुळे त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी व लवकर प्रकृती सुधारावी, या सद्भावनेतून येथील युवा सेनतर्फे रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी येथील श्री मंगळग्रह मंदिरात विशेष पूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांना निरोगी आयुष्य मिळून दीर्घायुष्य लाभावे आणि त्यांच्या हातून निरंतर जनसेवा घडावी, यासाठी विविध पदाधिकाऱ्यांकडून विधीवत सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

हा उपक्रम जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच अमळनेरचे माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा सेना लोकसभा संपर्कप्रमुख निखिल चौधरी, जिल्हाप्रमुख रोहित कोगटा, शिवसेना तालुकाप्रमुख गुलाब पाटील यांच्या मार्गदर्शनात झाला. युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण पुरुषोत्तम पाटील, तालुकाप्रमुख राहुल भास्कर कंजर, उपतालुकाप्रमुख राहुल साहेबराव पाटील, उपशहरप्रमुख सनी चव्हाण, शहर संघटक पंकज अरुण चौधरी, उपशहर संघटक यश मोहन साळुंखे तसेच तीर्थक्षेत्र शहरप्रमुख मनीष हरिश्चंद्र चौधरी, अमन खाटीक, सचिन विलास पाटील, अजय कुंदन पवार, प्रदीप किरण देशमुख आणि कुणाल ज्ञानेश्वर शिरसाट यांनी उपक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

कार्यक्रमास शिवसेनेच्या धर्मवीर आध्यात्मिक सेना समन्वयक तथा मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप आत्माराम बहिरम, शिवसेना शहरप्रमुख विलास सुखदेव कंखरे तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तालुकाप्रमुख प्रमोद शिंपी यांच्यासह युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक तसेच मंदिराचे सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबईच्या व्यासपीठावर अमळनेरचा डंका...!



**अमळनेर : मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' या अत्यंत प्रतिष्ठित संस्थेच्या शंभराव्या वर्षपूर्ती निमित्ताने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी भव्य समारंभात सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मा. माणगावे साहेब यांनी डॉ. डिगंबर महाले व श्री. पुषंद ढाके यांचा मेंबर ऑफ गव्हर्निंग कौन्सीलपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार केला. या शानदार सोहळ्यास विधानसभाध्यक्ष मा. ना. ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री मा. ना. उदय सामंत, अनेक आमदार, उद्योग व व्यवसाय विश्वातील अनेक मान्यवर प्रमुख अतिथी उपस्थित होते. सत्कार स्वीकारण्याप्रसंगी ज्येष्ठ नेत्या सौ. तिलोत्तमाताई पाटील या सुद्धा आमच्यासोबत उपस्थित होत्या. त्यांचे सुपुत्र वेदांशू पाटील यांचाही यावेळी स्वीकृत संचालक म्हणून नियुक्तीबद्दल विशेष सत्कार झाला.**

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४४५०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३३००० |
| १८ सोने ७५.००% | ₹ ११०००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३७०/- |

भाव प्रती १० ग्रॅम

बनावट शालार्थ आयडी घोटाळा

## पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण राज्याच्या शिक्षण क्षेत्राचे लक्ष नाशिक विभागात घडलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याने वेधून घेतले. शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणाऱ्या बहुचर्चित शालार्थ आयडी घोटाळ्यात विशेष तपास पथकाने (एसआयटी) शासनाची फसवणूक करणाऱ्या संशयितांविरुद्धचे पुरावे जमा करुन नाशिकरोड अतिरिक्त सत्र न्यायालयात तब्बल अकराशे पानांचे प्राथमिक दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर ३ जुलै रोजी पहिली सुनावणी झाली. या सुनावणीवेळी प्रमुख संशयित राज्य शिक्षण मंडळाचा सेवानिवृत्त अध्यक्ष तथा मुख्य संशयित नितीन उपासनी याच्यासह राहुल पवार यांनी कारागृहातूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजेरी लावली. दुसरा संशयित किरण पाटील हा न्यायालयात स्वत : उपस्थित होता. हे प्रकरण आता सत्र न्यायालयात वर्ग करण्याच्या प्रक्रियेसाठी ७ जुलै रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!









## संपादकीय

### तोतयांना मोकळे रान

प्रगत देशांमध्ये खासगीपणाच्या सुविधेबाबत सकारात्मक भूमिका असली, तरी तेथे सुरक्षाविषयक कायदे आणि तंत्रज्ञानविषयक साक्षरतेचे प्रमाणही मोठे आहे. आपला मोबाईल क्रमांक दडवून खऱ्या-खोट्या नावांनिशी संवादाची मुभा देणाऱ्या 'युजरनेम' या व्हॉट्सअॅपच्या नियोजित सुविधेबाबत खबरदारी घेण्याची केंद्र सरकारची भूमिका योग्यच आहे. याबाबत केंद्राने व्हॉट्सअॅप चालविणाऱ्या मेटा कंपनीला नोटीस बजावली आहे; तसेच याविषयी संपूर्ण स्पष्टीकरण आणि व्यापक चर्चेविना ही सुविधा सुरू न करण्याचे निर्देशसुद्धा कोट्यवधी वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहेत. एकीकडे ओळख लपवून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, हा चिंतेचा विषय ठरत असतानाच अशा सुविधांना परवानगी देण्याबाबत सरकारला काळजी वाटणे साहजिक आहे. ही सुविधा वापरकर्त्यांच्या फायद्याची असून, तिच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेतल्याचा दावा 'मेटा'ने केला आहे; मात्र त्याच्या वापरातून अनेक धोक्यांना निमंत्रण मिळताना प्रथमदर्शनी तरी दिसते. बदलत्या काळात संवाद-संपर्काची अनेक साधने दररोज बाजारात दाखल होत असली, तरी 'व्हॉट्सअॅप'ने आपल्या सुलभ-वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे जगभरातील संपर्काच्या क्षेत्रात जवळपास मक्तेदारी निर्माण केली आहे. 'व्हॉट्सअॅप'चा भारतात सुमारे ५० कोटी नागरिक वापर करतात. व्हॉटसअॅपच्या 'युजरनेम' या फीचरची घोषणा मध्यंतरी करण्यात आली. ते स्वीकारल्यानंतर वापरकर्त्यांना आपला मोबाइल क्रमांक दडवून ठेवून खऱ्या किंवा टोपणनावाने संवाद साधण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या वैकल्पिक फीचरचा महिलांसह अन्य वापरकर्त्यांना आपला खासगीपणा जपण्यासाठी उपयोग होईल; तसेच नवे आशयनिर्माते किंवा आपल्या ब्रँडची विशिष्ट ओळख मिळवण्यासाठी व्यावसायिक व अन्य संस्थांना त्याचा फायदा होऊ शकेल, हा त्यामागील उद्देश असल्याचे कंपनीकडून सांगितले गेले. काही दिवसांतच लाखो वापरकर्त्यांच्या त्यावर उड्या पडल्या. मात्र, त्याची अंगभूत वैशिष्ट्ये पाहता केंद्राने त्याला चाप लावण्याचा प्रयत्न केला आहे. ऑनलाइन फसवणूक, लैंगिक शोषण आणि अफवा पसरवण्यासाठी गुन्हेगार व समाजकंटक या सुविधेचा वापर करून घेतील, ही सरकारने व्यक्त केलेली भीती साधार आहे. अशीच ओळख लपविण्याची सुविधा असलेल्या 'टेलिग्राम'चा 'नीट' पेपरफुटीमागे वाटा असल्याच्या संशयावरून सरकारने परीक्षाकाळात त्यावर बंदी घातल्याची घटना ताजी आहे. सध्या आपली ओळख लपवून विरोधी विचारांवर हल्ला करणाऱ्या 'ट्रोलर'च्या फौजांनी अनेकांना समाजमाध्यमांवर हैराण केले आहे; अशा फीचरने समाजकंटकांना आणखी नवे हत्यार देण्यात हशील नाही. गेल्या काही काळात ऑनलाइन गुन्ह्यांमध्ये २४ टक्के वाढ झाली असून, वर्षभरात २८ लाख सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यामध्ये बँक खात्यातून फसवणूक, डिजिटल अॅरेस्ट, लग्नविषयक फसवणूक, लैंगिक शोषण अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे. अशाच प्रकारे ओळख लपवता येणारे 'डार्क वेब' हे सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचे आगार आहे, हे नव्याने सांगायला नको. एखाद्याचे 'यूजरनेम' भलत्यानेच आधी नोंदवले, तर प्रामाणिक वापरकर्त्याला स्वतःचे नाव न मिळण्याची अडचणही आहेच.

सरकारी विभाग, सेलिब्रिटी किंवा 'व्हेरिफाइड' वापरकर्त्यांची नावे राखीव राहणार असली, तरी सरकारी खाती- बँकांच्या नामसाधर्म्याचे यूजरनेम घेऊन फसवणूक सहज शक्य आहे. कोणत्याही खासगीपणाचा आदर करतानाच या कंपन्यांनी संबंधित देशातील कायद्यांच्या चौकटीतच सेवा दिली पाहिजे, ही अपेक्षा चुकीची ठरणार नाही. अशा गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी एकीकडे केंद्र सरकार सिमकार्डाशिवाय 'व्हॉटस्अॅप'च्या वापरावर निर्बंध (सिम बाइंडिंग) आणत आहे; त्याच्याशी नवे फीचर पूर्णतः विसंगत आहे. आपल्या माध्यमाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी 'एक्स'सारखे प्लॅटफॉर्म पडताळणी केलेली 'ब्लू टिक' सारखी सुविधा आणत असताना दुसरीकडे हा अनामिकतेचा आग्रह पटण्याजोगा नाही. प्रगत देशांमध्ये खासगीपणाच्या सुविधेबाबत सकारात्मक भूमिका असली, तरी तेथे सुरक्षाविषयक कायदे आणि तंत्रज्ञानविषयक साक्षरतेचे प्रमाणही मोठे आहे. भारतासारख्या देशात सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या पाहता अशा तोतयेगिरीला निमंत्रण धोकादायक ठरू शकते. अनेक गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणांनी अशा सुविधेतून गुन्हेगारी कारवाया किंवा अमली पदार्थांसारख्या बेकायदा व्यापाराला चालना मिळू शकते, असा इशारा दिला आहे. त्यामुळेच वापरकर्त्यांचे हित लक्षात घेता, सर्व शंकांचे निराकरण झाल्याशिवाय अशा सुविधांना परवानगी मिळता कामा नये.

# १८ वर्षे आयटी क्षेत्रात काम; ४७ व्या वर्षी बनल्या डॉक्टर

## कसा आहे जान्हवी राव यांचा प्रेरणादायी प्रवास? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वयाची अट फक्त मनाची असते. १८ वर्षे आयटी क्षेत्रात काम केल्यानंतर वयाच्या ४० व्या वर्षी एमबीबीएस करून ४७ व्या वर्षी डॉक्टर बनलेल्या जान्हवी राव यांची थक्क करणारी यशोगाथा.

यशाच्या अनेक गोष्टी तुम्ही ऐकल्या असतील, पण काही किस्से असे असतात जे हे सिद्ध करतात की स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वय कधीही आडवे येत नाही. आज आपण अशाच एका महिलेची गोष्ट जाणून घेणार आहोत, ज्यांनी अशा वयात आयुष्यातील सर्वात मोठा निर्णय घेतला, जेव्हा बहुतेक लोक आपल्या करिअरमध्ये पूर्णपणे स्थिरावलेले असतात. तब्बल १८ वर्षे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम केल्यानंतर त्यांनी वयाच्या ४० व्या वर्षी 'एमबीबीएस' करण्याचा निर्णय घेतला. कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी आपले स्वप्न पूर्ण केले आणि वयाच्या ४७ व्या वर्षी त्या डॉक्टर बनल्या.

आम्ही बोलत आहोत जान्हवी अजित राव यांच्याबद्दल. ज्यांचा हा प्रवास वय किंवा परिस्थितीच्या भीतीमुळे आपली स्वप्ने अधुरी

**सक्सेस स्टोरी**

सोडणाऱ्या प्रत्येकासाठी एक मोठी प्रेरणा आहे. मजबूत इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही वयात नवी सुरुवात करता येते, हेच त्यांच्या या प्रवासातून दिसून येते.



**इंजिनिअरिंगमध्ये यशस्वी करिअर**

जान्हवी अजित राव यांनी कॅलिफोर्नियामधून इलेक्ट्रॉनिक्सचे शिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांनी अमेरिका आणि भारतातील अनेक मोठ्या तंत्रज्ञान (आयटी) कंपन्यांमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम केले. इतकेच नव्हे, तर त्यांनी स्वतःचा टेक्नॉलॉजी स्टार्टअप देखील सुरू केला होता. जवळपास १८ वर्षे त्यांनी आयटी क्षेत्रात एक यशस्वी करिअर घडवले.

**एका आजाराने बदलले आयुष्य**

वर्ष २००३ मध्ये जान्हवी यांना 'रुमॅटॉइड आर्थरायटिस' नावाचा ऑटोइम्यून आजार झाला. उपचारादरम्यान त्यांनी डॉक्टरांना रुग्णांची काळजी घेताना आणि त्यांचे आयुष्य अधिक चांगले करताना जवळून पाहिले. या अनुभवाने त्यांच्या मनात डॉक्टर बनण्याची तीव्र इच्छा जागृत केली आणि येथूनच त्यांच्या आयुष्याला एक नवीन कल्पित वळण मिळाले.

**वयाच्या ४० व्या वर्षी घेतला मोठा निर्णय**

बहुतेक लोक वयाच्या चाळीशीपर्यंत आपल्या करिअरमध्ये पूर्णपणे सेटल होतात. परंतु जान्हवी यांनी नेमक्या याच वयात आपली सॉफ्टवेअर इंजिनिअरची चांगली चाललेली नोकरी सोडण्याचा धाडसी घेतला. डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्याचे ठरविले.

**वर्ष २०१३ मध्ये सुरू केले वैद्यकीय शिक्षण**

वर्ष २०१३ मध्ये त्यांनी बेंगळुरूच्या 'एम.एस. रामैया मेडिकल कॉलेज' मध्ये एमबीबीएससाठी प्रवेश मिळविला. वैद्यकीय शिक्षण सोपे नव्हते, विशेषतः वयाच्या या टप्प्यावर; पण त्यांनी हार मानली नाही. सलग ८ वर्षे अहोरात्र मेहनत केल्यानंतर त्यांनी एमबीबीएसची पदवी यशस्वीपणे संपादन केली.

**सध्या अमेरिकेत कार्यरत**

अनेक अडचणींवर मात करत अखेर वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांनी यश मिळवले. आज डॉ. जान्हवी अजित राव अमेरिकेत 'प्रायमरी केअर फिजिशियन' म्हणून कार्यरत आहेत. यासोबतच त्या वैद्यकीय क्षेत्रात अधिक उत्तम सेवा देता यावी म्हणून 'एम.डी.'चे पुढील शिक्षणही घेत आहेत.

स्वतःवर विश्वास असेल, तर माणूस आयुष्याच्या कोणत्याही वळणावर एक नवी सुरूवात करून यश मिळवू शकतो, हेच त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.

# अमळनेर बसस्थानकात ईबीएक्स प्रतिनिधीवर विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचा आरोप

## पालकांची आगार व्यवस्थापकांकडे धाव; चौकशीचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बसस्थानक परिसरात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या ईबीएक्स प्रतिनिधीवर एका शालेय विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे बसस्थानक परिसरात खळबळ उडाली असून, संबंधित विद्यार्थिनीचे पालक आणि ग्रामस्थांनी आगार व्यवस्थापकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अमळनेर आगारात ईबीएक्स प्रतिनिधी म्हणून कार्यरत उमेश शिवदे यांना 'एनसीएमसी कार्ड' तयार करून देण्यासाठी प्रवासी पास कार्यालयाजवळ जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शनिवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी काही शालेय विद्यार्थिनी बसची प्रतीक्षा करत उभ्या असताना संबंधित प्रतिनिधीने त्यांना कार्यालयात बोलावून अयोग्य पद्धतीने संवाद साधल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. तक्रारीनुसार संबंधित प्रतिनिधीने विद्यार्थिनींना 'तुम्ही मला रोज भेटायला या, मी तुम्हाला रोज चॉकलेट देईन,' असे सांगितल्याचा आरोप केला आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनी घाबरल्याने त्यांनी हा प्रकार पालकांना सांगितला. त्यानंतर संतप्त पालक व ग्रामस्थांनी आगार व्यवस्थापक प्रमोद चौधरी यांची भेट घेऊन लेखी तक्रार दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आगार व्यवस्थापकांनी संपूर्ण प्रकरणाचा अहवाल विभागीय वाहतूक अधिकारी, जळगाव विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. तसेच तक्रारीची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

> ***"संबंधित कर्मचाऱ्याविषयी यापूर्वीही कामातील हलगर्जीपणा आणि कामचुकारपणाबाबत तक्रारी प्राप्त होत्या. त्यामुळे त्याची ईबीएक्स प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली होती. आता त्याच्याविरुद्ध विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. या घटनेची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात कळविली असून, त्यांच्या निर्देशानुसार पुढील योग्य ती कारवाई केली जाईल.***
> ***- प्रमोद चौधरी, आगारप्रमुख, अमळनेर.***




*अमळनेर : हिंदू समाज पार्टीचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष योगेश पिंगळे यांनी सोमवार, दि. ६ जुलै रोजी सकाळी श्री मंगळग्रह मंदिरास सदिच्छा भेट देऊन श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचा सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर. शेजारी मंगल सेवेकरी बाळा पवार.*

# फळे फ्रीजमध्ये ठेवून खावीत की नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बाजारातून आणलेली फळे ताजी राहावीत म्हणून आपण ती सरळ फ्रीजमध्ये ठेवतो. पण सायन्सनुसार ही सवय प्रत्येक फळासाठी योग्य नाही. केळी, आंबा, पपई आणि टोमॅटो यांसारखी फळे झाडावरून काढल्यानंतरही पिकत राहतात. फ्रीजमधील थंड हवेमुळे त्यांची नैसर्गिकरीत्या पिकण्याची प्रक्रिया थांबते.

संशोधनानुसार टरबूज आणि खरबूज यांसारखी फळे फ्रीजमध्ये ठेवल्यास त्यातील अँटीऑक्सिडंट्स आणि आवश्यक पोषक तत्वे वेगाने कमी होतात.

सफरचंद किंवा नाशपाती फ्रीजमध्ये जास्त काळ ठेवल्यास ते मऊ पडतात आणि त्यांची मूळ चव व कुरकुरीतपणा नाहीसा होतो. जर फळे कच्ची असतील तर आधी ती खोलीच्या तापमानाला नीट पिकू द्या, आणि त्यानंतरच ती थंड करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. द्राक्षे, स्ट्रॉबेरी, चेरी आणि लिंबूवर्गीय फळे (संत्री, मोसंबी) आणल्याबरोबर फ्रीजमध्ये ठेवली तरी चालतात, कारण ती झाडावरून काढल्यावर पुढे पिकत नाहीत.

कापलेली फळे फ्रीजमध्ये ठेवताना काळजी घ्या

फळ कापल्यानंतर ते कधीही उघडे ठेवू नका. ते एअर-टाईट डब्यात ठेवा आणि २४ तासांच्या आत खा, अन्यथा त्यात बॅक्टेरिया वाढू शकतात.

# आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी

## नगरसेविका शोभाबाई गढरे यांची मागणी; मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या आरोग्य विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी तसेच त्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य तत्काळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका शोभाबाई भिवसन गढरे यांनी पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पालिकेचे आरोग्य विभागातील कर्मचारी गटार, नाले, सार्वजनिक शौचालये, धुराडी, कचरा तसेच इतर अस्वच्छ ठिकाणांची साफसफाई करत असल्याने त्यांना विविध संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने वेळोवेळी त्यांची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. याशिवाय या कर्मचाऱ्यांना रेनकोट, गमबूट, हातमोजे, मास्क तसेच संपूर्ण सुरक्षा संच (सेफ्टी किट) तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून काम करताना त्यांच्या आरोग्याला कोणताही धोका निर्माण होणार नाही.

नगरसेविका गढरे यांच्या या मागणीची दखल घेऊन पालिका प्रशासनाने आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# 'अभिनयातील महामेरू...'

उर्दू, हिंदी व इंग्रजी साहित्याचा तसेच तत्त्वज्ञानाचा ज्याचा उत्तम अभ्यास होता, राजकीय, सामाजिक प्रश्नांची ज्याला छान समज होती, अभिनय ही गंभीरपणे घ्यायचीच गोष्ट आहे हे त्याने आपल्या कृतीद्वारे सतत अधोरेखीत केले होते, तसेच 'हाय व बाय' या त्याकाळच्या संस्कृतीतील पश्चिमी अनुकरणप्रियता व सर्व प्रकारच्या उथळपणाचा ज्याने तिरस्कार केला व प्रेक्षकांच्या मनाच्या गाभाऱ्यापर्यंत पोहोचलेला हा खरोखरच हिंदी चित्रपटसृष्टीचा 'कोहिनूर' हीराच होता.

शिवाय भारतीय सिनेमा म्हणून जे काही अद्भुत रसायन आहे, त्याच्या जडणघणीत अनमोल वाटा असलेल्या कलावंतांत ज्याचा समावेश होतो व ज्याने पडद्यावरचा 'अनभिषीक्त अभिनय सम्राट' म्हणून मान्यता संपादन केली होती, तो होता 'मोहम्मद युसूफ खान ऊर्फ दिलीपकुमार.' त्याचा आज मंगळवार, दि. ७ जुलै रोजी स्मतिदिन.

दि. ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर (पाकिस्तान) येथे जन्मलेल्या दिलीपकुमारने महाराष्ट्रातील देवळाली, नाशिक येथे काही काळ शालेय शिक्षण घेतले. पुढील शिक्षण मुंबई येथे खालसा व विल्सन कॉलेजमध्ये पूर्ण पदवी न घेता आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मध्येच सोडावे लागले.

स्वकमाई करत अभिनयाची आवड असल्याने बॉम्बे टॉकीज येथे अभिनेत्री व निर्माती स्व. देविका राणीशी संर्पकात आले. त्यांनी दिलीपकुमारला त्यांच्या स्वनिर्मीत चित्रपट 'ज्वार भाटा' (१९४४) मध्ये सर्वप्रथम सहनायकाची संधी दिली. या चित्रपटात त्याची नायिका होती मृदला. याच देविका राणीने त्याचे दिलीपकुमार हे नामकरण केले. त्याला प्रसिद्धी मात्र 'अंदाज' (१९४९) या चित्रपटामुळे मिळाली होती.

दिलीपकुमार चित्रपटसृष्टीत आले तेव्हा खूप बारीक तब्येत असल्याने पडद्यावर दिसताच प्रेक्षक हसायचे. आधीच्या असफल चित्रपटांनंतर १९४७ साली स्व. नूरजहांचा पती शौकत हुसेनने 'जुगनू' चित्रपट बनविण्याची तयारी सुरू केली होती. त्याकाळचा दिलीपकुमारचा नट-दिग्दर्शक मित्र 'लुकमान' हा 'जुगनू'त नायक म्हणून घेण्यासाठी शौकतकडे प्रयत्नशील होता. त्यांच्याकडे दिलीपकुमार यांना घेऊन जात असताना वाटेत शिवाजी पार्कजवळ 'हिमालयवाला' नावाचा नामांकीत अभिनेता भेटला. तो म्हटला, की 'याला कुठे घेताय चित्रपटात? हा तर टी.बी. पेशंट वाटतो.' तरी देखील शेवटी दिलीपजींचीच निवड झाली. त्यातील नायिका नूरजहांसोबत काम करण्यापूर्वी, त्याच्या मनावर एवढा ताण वाढला होता, की त्याने शूटिंगपूर्वी चक्क गरम पाण्यातून ब्रँडी घेतली होती.

त्यानंतर मात्र दिलीपकुमार खऱ्या अर्थाने खुलला व उत्कृष्ट अभिनयाचे प्रत्यंतर आणि अनुभूती, प्रेक्षकांना दर चित्रपटागणीक देत गेला. 'अंदाज', 'शिकस्त', 'देवदास', 'यहुदी', 'मेला', 'बाबुल', 'दीदार', 'उडन खटोला', 'दाग' वगैरे चित्रपटांनी त्याला 'ट्रॅजेडी किंग' हा किताब बहाल केला. कारण रसिकांना त्याच्या दुःखी नायकात स्वतःचा आत्मा गवसत असे. एखाद्या चित्रपटात तो शेवटपर्यंत जीवंत राहिला तर प्रेक्षकांना वाटायचे की जणू त्याने आपला विश्वासघातच केलाय. इतके त्याच्या अभिनयाचे गारुड रसिकांवर होते.

स्व. के. एल. सैगलचा 'देवदास' प्रौढ दिसे, करुण व सहज-सरळ वाटत असे. मात्र, दिलीपकुमारचा 'देवदास' शैलीदार व मनाला भिडणारा वाटायचा. चेहऱ्यावर हाताचा पंजा ठेवणे, सौम्य स्वरात संवाद पुटपुटणे, संथ हालचाली व गंभीर भावमुद्रा, ही त्यांची शैली 'देवदास'मुळे अधिकच लोकप्रिय झाली होती. तरुणाई तर त्याच्या या शैलीचे अनुकरण करू लागली होती. वैचारिक अभिनेता ही त्याची प्रतिमा ठळक झाली होती. मात्र, हळूहळू या ट्रॅजिक भूमिकांचा इतका अतिरेक झाला, की त्याचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊ लागला. त्यावेळी त्याने मनोविकारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार जाणूनबुजून हलक्याफुलक्या भूमिका स्वीकारल्या होत्या.

१९५० ते ६० च्या दशकात दिलीपकुमारचा भारतीय सिनेमात दबदबा होता. १९४४ ते १९९९ या काळात सुमारे ८० चित्रपटांत त्या काळच्या व आताच्या काही यशस्वी नट्यांसोबत सर्व प्रकारच्या भूमिका करून आपले वर्चस्व सिद्ध केले होते. त्यासोबत



'अभिनय सम्राट' म्हणून रसिकांच्या हृदयावर राज्य केले. स्वनिर्मीत व लिखीत 'गंगा-जमुना' (१९६१) मध्ये तर त्याने कबड्डी खेळताना देखील कमालीचा अभिनय केला होता. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी फीचर फिल्मसाठी राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला. अभिनेत्री कामिनी कौशल व मधुबालासोबतच्या अयशस्वी प्रेम संबधांनंतर वयाच्या ४४ व्या वर्षी दिलीपकुमारने सायरा बानो (वयाने २२ वर्षे लहान) शी १९६६ ला निकाह केला. दुसरा विवाह १९८१-८२ मध्ये नटी अस्मा रहमानसोबत केला. पण १९८३ च्या दरम्यान अस्मापासून तो वेगळा झाला. मात्र, सायरा बानोसोबत शेवटपर्यंत राहिला.

सततच्या गंभीर अभिनयाचा त्रास जाणवल्याने दिलीपकुमारने काही काळ (१९७६ ते ८१) विश्रांती घेतली. त्यानंतर 'क्रांती' (१९८१), 'विधाता' (१९८२), 'शक्ती' (१९८२), 'दुनिया' (१९८४), 'इज्जतदार' (१९९०) व 'सौदागर' (१९९४) वगैरे चित्रपटांत 'चरित्र अभिनेता व अॅग्री ओल्ड मॅन'च्या भूमिका उत्तमरित्या साकारल्या. या भूमिका आज देखील प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. कारण त्याने गंभीर-चरित्र भूमिकांना देखील 'स्टार अपील' मिळवून दिले होते.

'शक्ती' सिनेमा पाहून आल्यानंतर 'ग्रेट शोमन राज कपूरने दिलीपजीं'ना एक बुके व सोबत चिट्ठी पाठविली होती. ज्यात त्याने म्हटले होते, की 'बादशहा हा नेहमीच बादशहाच असतो.' त्याच्या समकालीन नटांनी देखील उत्कृष्ट अभिनेता म्हणून स्वीकारले होते.

दिलीपकुमारच्या 'दाग' (१९५२) चित्रपटांसाठी 'फिल्मफेअर' पुरस्कार मिळविणारा तो पहिला भारतीय अभिनेता होता. १९५० च्या दशकात प्रतिसिनेमा एक लाख रुपये मेहनताना घेणारा हा स्टार सन २०२० मध्ये प्रतिसिनेमा ९० लाख मानधन घेणारा पहिला भारतीय अभिनेता होता.

हा कलावंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानीत केला गेला होता. त्यात 'फिल्मफेअर अॅवॉर्ड' ८ वेळा (दिलीपकुमारनंतर हा पुरस्कार फक्त शाहरुख खानने ८ वेळा घेतलाय. आणि या दोघांचे रेकॉर्ड आजही अबाधीत आहे.) भारत सरकारचा 'पद्मभूषण' पुरस्कार (१९९१), 'फिल्मफेअर' life time Achive-ment Award (१९९३), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९९४), पाकिस्तान सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान, 'निशान-ए-इम्तियाज' (१९९८) हा पुरस्कार मिळविणारा एकमेव भारतीय अभिनेता होय. तसेच त्यावेळच्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने त्यांना राज्यसभा सदस्यत्व देऊन (०३ एप्रिल २००० ते ०२ एप्रिल २००६) सन्मान केला होता. याव्यतिरिक्त इतरही मानाचे पुरस्कार मिळवून त्यांचे नाव 'गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये समाविष्ट झालेय. भारतीय सिनेमात Method Acting चे दिलीपकुमार हे 'जनक' मानले जातात. सुपर स्टार अमिताभ बच्चन व शाहरुख खान दिलीपजींना आपले प्रेरणास्त्रोत मानतात. त्यांच्या अभिनयात दिलीपजी जाणवतात. अशा या महान कलाकाराचा अखेरचा चित्रपट होता 'किला' (१९९८). येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी 'उत्कृष्ट अभिनयाच्या विद्यापीठा'चा, पाया रचून दिलीपकुमार वयाच्या ९९ व्या वर्षी अर्थात ०७ जुलै २०२१ मध्ये हिंदी चित्रपसृष्टीला 'अलविदा' म्हणून खऱ्या अर्थाने पोकळी निर्माण करून गेले.

आज त्यांच्या १०४ व्या स्मृतिदिनानिमित्त सर्व रसिक प्रेकक्षकांच्या वतीने विनम्र श्रद्धांजली...!

**- शरद आ. सोनवणे, अमळनेर.**
मो. : 94201 08305

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# जनतेच्या विश्वासातून विकासाचा ध्यास असणारे आमदार अनिलदादा पाटील

***जनतेच्या विश्वासातून विकासाचे ध्येय कायम डोळ्यांपुढे ठेवत जनमानसाच्या हृदयात स्थान निर्माण करणाराच नेता म्हणून सिद्ध होत असतो, ही ब्रीद तंतोतंत अंगीकारत आमदार दादासाहेब अनिल भाईदास पाटील यांनी अमळनेर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या मनात आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच त्यांना जनता आदराने भूमिपुत्र, विकासपुरुष, जननेते अशी विविध विशेषणांनी गौरविते. असे सर्वमान्य लोकनेते मा. आमदार दादासाहेब अनिलदादा पाटील यांचा आज मंगळवार, दि. ७ जुलै रोजी वाढदिवस. त्यानिमित्त...***

राजकारण ही केवळ सत्तेची स्पर्धा नसते, तर ती समाजकारण, विकास आणि लोकसेवेची अखंड साधना असते. जनतेच्या विश्वासाला सर्वोच्च स्थान देत प्रत्येक निर्णयात सर्वसामान्यांच्या हिताचा विचार करणारे नेतृत्व समाजात कायम स्मरणात राहते. अमळनेर तालुक्याच्या राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक इतिहासात असेच एक विश्वासार्ह, अभ्यासू, संयमी, विकासाभिमुख आणि लोकहितवादी नेतृत्व म्हणून आमदार अनिलदादा पाटील यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. दादांनी आपल्या कार्याचा पाया सत्तेवर नव्हे, तर जनतेच्या विश्वासावर उभारला. संघर्ष, प्रामाणिकपणा, अभ्यासू वृत्ती, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांविषयी असलेली आत्मीयता, विकासासाठी असलेली तळमळ आणि प्रत्येक व्यक्तीच्या सुख-दुःखात धावून जाण्याची संवेदनशीलता या गुणांमुळे त्यांनी अमळनेरकरांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे.

### सर्वसामान्य कुटुंबातील संस्कार

अनिलदादांचा जन्म ७ जुलै १९६८ रोजी सुसंस्कृत आणि सर्वसामान्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता होते. शिक्षणाचे महत्त्व जाणणारे वडील आणि संस्कारमय कौटुंबिक वातावरण यामुळे बालपणापासूनच दादांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, प्रामाणिकपणा, अभ्यासू वृत्ती बळावली. त्याचा परिणाम म्हणून दादांनी प्राथमिक शिक्षण जळगाव जिल्ह्यात पूर्ण करून पुढील उच्च शिक्षणासाठी पुणे गाठले.

### उच्च शिक्षणाचा भक्कम पाया

राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी ज्ञानसंपन्न होण्याचा मार्ग निवडला. पुणे येथे त्यांनी एम.कॉम., एमबीए आणि एलएल.बी अशी उच्च पदवी प्राप्त केली. आर्थिक, कायदेशीर, प्रशासकीय आणि व्यवस्थापन विषयांचा सखोल अभ्यास केल्यामुळे त्यांच्या निर्णयक्षमतेत दूरदृष्टी आणि अभ्यासपूर्ण विचारसरणी निर्माण झाली. आज कोणत्याही विषयावर विधानसभेत अथवा प्रशासनासमोर मुद्देसूद भूमिका मांडताना त्यांच्या अभ्यासू स्वभावाची प्रचिती येते.

### कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व

दादांचा विवाह दि. १७ मे १९९७ रोजी दोनगाव (ता. धरणगाव) येथील सौ. जयश्रीताई पाटील यांच्याशी झाला. राजकारणातील व्यस्ततेतही त्यांनी कुटुंबाकडे कधीही दुर्लक्ष केलेले नाही. सामाजिक जबाबदारी आणि कौटुंबिक जबाबदारी यांचा सुंदर समतोल राखत ते आदर्श कौटुंबिक जीवन जगतात. सौ. जयश्रीताई यांनीही नगराध्यक्ष म्हणून शहर विकासात उल्लेखनीय योगदान देत त्यांच्या कार्याला सक्षम साथ दिल्याची अनुभूती अमळनेरकांना आहे.

### समाजकारणातून राजकारणाकडे...


उच्च शिक्षणानंतर अनेकांप्रमाणे नोकरीचा मार्ग न स्वीकारता दादांनी समाजसेवेचा मार्ग निवडला. सुशिक्षित तरुणांनी राजकारणात यावे, विकासाची दिशा ठरवावी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी झटावे, या विचारातून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. त्यांच्या राजकीय वाटचालीची सुरूवात विकास सोसायटीपासून झाली. त्यानंतर त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीत प्रवेश करून सलग दहा वर्षे सभापती म्हणून काम केले.

### शेतकऱ्यांसाठी झटणारे नेतृत्व

बाजार समितीचे सभापती असताना दादांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. विशेषतः उघड कापूस लिलाव प्रणाली सुरू करून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य भाव मिळावा, यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्या काळात बाजार समितीचा कारभार अधिक पारदर्शक, शेतकरी हिताचा आणि विकासाभिमुख करण्यासाठी त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्यावरील विश्वास अधिक दृढ झाला.

### ग्रामीण विकासाची नवी दिशा

सन २००० मध्ये अनिलदादांनी प्रथमच जळगाव जिल्हा परिषद निवडणूक लढविली. जनतेने त्यांच्यावर विश्वास ठेवत त्यांना विजयी केले. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नव्हता, तर विकासाच्या विचारांचा विजय होता. पहिल्याच कार्यकाळात त्यांनी ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला. गावागावातील शेतरस्ते, बंधारे, लघुपूल, पिण्याच्या पाण्याच्या योजना, शाळांची दुरुस्ती, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा, शेती अवजारे, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार, सिंचन व्यवस्था यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या कार्याची दखल घेत जनतेने २००५ मध्ये पुन्हा एकदा त्यांना जिल्हा परिषदेत निवडून दिले.



### सहकार क्षेत्रातील दमदार नेतृत्व

शेतकरी हा सहकाराचा केंद्रबिंदू आहे, या विचारावर विश्वास ठेवून त्यांनी सहकार क्षेत्रातही मोठे योगदान दिले.
सन २०११, २०१६ आणि २०२१ या सलग तीन निवडणुकांमध्ये जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदीही त्यांनी विजय मिळविला. संचालक म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज, पीक कर्ज वेळेवर उपलब्ध व्हावे, सहकारी संस्थांना आर्थिक बळ मिळावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

### वैयक्तिक दुःखावरही मात

सार्वजनिक जीवनात यश मिळत असतानाच नियतीने त्यांच्या आयुष्यात मोठी परीक्षा घेतली. सन २००४ मध्ये त्यांचे लहान बंधू स्व. राजेश पाटील यांचे अपघाती निधन झाले. हे दुःख त्यांच्या संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत असह्य होते. परंतु संकटापुढे न झुकता त्यांनी आपल्या कुटुंबाला धीर दिला. स्वतःचे दुःख मनात ठेवून जनतेच्या सेवेत ते पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहिले.

### अमळनेरच्या विकासात मोलाचे योगदान

ग्रामीण भागाबरोबरच शहराचा विकासही तितकाच महत्त्वाचा असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी सन २०११ मध्ये शहर विकास आघाडीची स्थापना केली. या निवडणुकीत त्यांच्या पत्नी सौ. जयश्रीताई नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या. त्यांच्या कार्यकाळात अमळनेरमध्ये अनेक ऐतिहासिक विकासकामे झाली.

### पराभवातूनच विजयाची वाट

दादांनी २००९ आणि २०१४ मध्ये विधानसभा निवडणूक लढविली. दोन्ही वेळा विजय थोडक्यात हुकला; परंतु त्यांनी कधीही जनतेपासून अंतर ठेवले नाही.पराभवामुळे निराश न होता त्यांनी गावोगावी फिरून लोकांशी संवाद वाढविला. प्रत्येकाच्या अडचणी समजून घेतल्या. संकटाच्या काळात मदतीला धावून गेले.

### 'राष्ट्रवादी'तील प्रवेशाने नवे पर्व सुरू

सन २०१७ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यातून त्यांनी सन २०१९ ची विधानसभा निवडणूक भरघोस मतांनी जिंकली. हा त्यांच्या राजकीय जीवनातील सुवर्ण क्षण ठरला. याच काळात अमळनेरच्या जनतेने त्यांना प्रेमाने आणि अभिमानाने 'भूमिपुत्र' ही सन्मानाची उपाधी बहाल केली.

### विधानसभेतील अभ्यासू आणि प्रभावी नेतृत्व

आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांच्या अभ्यासू वृत्तीची दखल घेत त्यांना महाराष्ट्र विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर पक्षाने त्यांच्यावर प्रमुख प्रतोद ही महत्त्वाची जबाबदारीही सोपविली. याचवेळी त्यांनी अमळनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार केला आणि शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून अनेक महत्त्वाकांक्षी कामांना गती दिली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे महसूल विभागाच्या नवीन इमारतीसाठी १४.१७ कोटी रुपयांचा निधी, तर प्रशासकीय इमारतीसाठी ११.६० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. त्यांनी २ जुलै २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२४ या काळात राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान मिळवून मतदारसंघाचा विकास साधला. आजही ते आमदार म्हणून दिवसरात्र मतदारसंघाच्या विकासासाठी अहोरात्र झटताना दिसतात. अशा आदरणीय दादांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी तमाम अमळनेर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने मंगलमय शुभेच्छा!


* शब्दांकन *
गणेश धर्मराज पाटील
व्हॉईस प्रेसिडेंट : अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ लि.
चेअरमन : बाह्मणे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.


















# लाडक्या बाप्पांकडून घ्या ही मोलाची शिकवण!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भगवान श्री गणेशांच्या कथांमधून शिकण्यासारखे अनेक आध्यात्मिक धडे असले, तरी काही धडे असे आहेत जे आपल्या दैनंदिन व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात स्थान मिळवितात. चांगल्या सुरूवातीचे आणि बुद्धीची देवता मानले जाणारे, त्यांच्या नावानेच नवीन उपक्रम हाती घेतले जातात आणि जीवनातील महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. कारण बाप्पा स्वतःच्या आयुष्यातील अडथळे दूर करणे हा धर्म बनविला पाहिजे, व्यावसायिक जीवनात असो वा वैयक्तिक जीवनात, योग्य वृत्तीने–कधीही न हार मानण्याची वृत्ती–अगदी सर्वांत दुर्गम वाटणारी अडचण देखील तुमचे जग कोसळल्याशिवाय हाताळता येते. तुम्हाला फक्त स्वतःवर विश्वास हवा आहे, हे शिकवतात. पाहूया गणपती बाप्पांकडून काय मोलाची शिकवण आपण घेऊ शकतो.

**सर्वांसाठी नम्रता आणि आदर :** श्री गणेशांचे वाहन उंदीर आहे. जे आपल्याला शिकवितात की आपण सर्वांत लहान आणि कमकुवत प्राण्यांचाही आदर केला पाहिजे आणि सर्वांशी नम्र असले पाहिजे.

**पालकांचा आदर :** श्री गणेश त्यांचे पालक, भगवान शिवजी आणि देवी पार्वती यांचे खूप आज्ञाधारक होते. यावरून आपण शिकतो, की आपण नेहमीच आपल्या पालकांचा आणि वडिलांचा आदर केला पाहिजे.

**बुद्धिमत्ता आणि हुशारी :** जेव्हा श्री गणेशांना जगाला प्रदक्षिणा घालण्यास सांगण्यात आले तेव्हा त्यांनी हुशारीने त्यांच्या पालकांना प्रदक्षिणा घालून आपली बुद्धिमत्ता दाखविली. यावरून असे दिसून येते, की कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी विचार करणे आणि हुशार असणे महत्त्वाचे आहे.

**अडथळ्यांना घाबरू नका :** गणपती बाप्पांना विघ्नहर्ता म्हटले जाते, जे प्रत्येक अडथळा दूर करतात. त्यांची कहाणी आपल्याला शिकविते की आपण कोणत्याही शक्तिशाली अडथळ्याला घाबरू नये आणि आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

**कर्तव्यनिष्ठा :** महाभारत लिहिताना श्री गणेशांनी एक दात तोडला आणि तो पेन म्हणून वापरला. याचा अर्थ असा, की आपण एका महान कार्यासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे आणि श्री गणेशांचे मोठे कान 'लंबकर्ण'चे प्रतीक आहेत. ते आपल्याला शिकवितात की आपण नेहमी इतरांचे लक्षपूर्वक ऐकले पाहिजे आणि नवीन कल्पनांना ग्रहणशील असले पाहिजे.









